Impact Factor-5.707 ISSN-2349-638x

# National Seminar

on

# ‘Dynamic Changes of Globalization in History, Polity and Geography’

12th March 2019.

**Organized by**

Dr.Patangrao Kadam Arts And Commerce College,
Pen, Raigad (MS)India

**Published By**

Aayushi
International Interdisciplinary
Research Journal (AIIRJ)
PEER REVIEWED & INDEXED JOURNAL
March- 2019

| | | | |
|---|---|---|---|
| 41 | Ashok P.Kamble | Globalization Effect On Economy Specially On Busssiness | 157 |
| 42 | Dr. Rajendra O. Parmar | Globalization and Its Impact on Social Changes in India | 161 |
| 43 | Rajendra Shingate | A Geomorphic Study of River Channel Adjustment to Meander Cutoffs in Some Part of Godavari River Basin | 169 |
| 44 | Mr. Rajendra Shingate | A Geographical Study Of Health Care Facilities In Marathwada Region (Ms, India) | 177 |
| 45 | Dr. Jitendra Bharatrao Chavan<br>Dr. Datta Janardhan Ermule | Globalization And Its Impact On Various Sectors Of Indian Economy | 185 |
| 46 | Dr. Navnath Sopanrao Gaikwad | A Study of Cooperative Movement in Maharsashtra | 187 |
| 47 | Ram S. Kolapkar | Functional Assessment Of Urban Green Spaces (UGS) On The Basis Of Service Area | 190 |
| 48 | श्री .शेख आलम गफूर, | जागतिकीकरणाच्या प्रवाहांमध्ये श्रमबाजारपेठे समोरील आव्हाने आणि उपाय योजना | 200 |
| 49 | आनंद आत्माराम ढेंगळे | जागतिकीकरणाचे समाजावर झालेले आर्थिक परिणाम | 204 |
| 50 | प्रा. अडलिकर जयवंती मधुकर | भारतीय व्यापार व व्यवसायावरील जागतिकीकरणाचा प्रभाव | 206 |
| 51 | प्रा.डॉ.राजाराम महादेव थोरात | हवामान बदल आणि वाळवंटीकरण | 211 |
| 52 | डॉ. ए.एम. सोहनी | जागतिकरण आणि बहुजन समाज | 217 |


www.aiirjournal.com

# जागतिकरण आणि बहुजन समाज

डॉ. ए.एम. सोहनी

शेठ ज. नौ.पालीवाला महाविद्यालय,पाली.सुधागड

स्वातत्र्यपूर्व काळात भारतामध्ये आर्थिक सामाजिक व सांस्कतिक परिरस्थिती अत्यंत गंभीर स्वरूपाची होती. ही परिस्थिती विचारात घेऊन भारतीय राज्य घटनेने कल्याणकारी राज्याचा अवलंब केला. उत्पादनाच्या साधन सामुग्रीच्या खाजगी मालकीने अशा साधन सामुग्रीपासून वंचित राहिलेल्या बहुसंख्य समाजास भौतिक जीवनामध्ये मदत मिळण्यासाठी शिक्षण आरोग्य व पिण्याचे स्वच्छ पाणी मोफत किंवा कमीत कमी दराने मिळवून देण्याची जबाबदारी सरकारने घेतली आहे. यामुळे गेल्या सत्तर वर्षात गरिबांना दिलासा व मदत मिळाली आहे. म्हणून बहूतेकांच्या जीवनात काही प्रमाणात बदल घडून आल्याचे दिसून येत आहे. हे खरे असले तरी १९९१ पासून भारत देशाने जागतिकी करण धोरणाचा स्विकार केलेला आहे. पण या धोरणाचा व्यापक परिणाम म्हणून कल्याणकारी राज्य व्यवस्थेवरच आघात झालेला दिसून येतो.

सामान्य जातेच्या दृष्टीकोणातून सर्वात गंभीर बाब म्हणजे जागतिकी करणाच्या प्रकियेस प्रारंभ झाल्यापासून आपल्या देशात तरुणांना रोजगार निमितीच्या कार्याकडे सरकारने पाहिजे त्या प्रमाणात लक्ष दिलेले नाही. सततची वाढणारी लोकसंख्या, बदलते तंत्रज्ञान, उत्पादन प्रकियेतील भांडवलाचा वाढता वापर त्यातही आयात केलेल्या तंत्रज्ञानाचा अधिक वापर, बंद होणारे हजारो लहान माठे उद्योग व्यवसाय बहुराष्ट्रिय कंपण्यांचे वाढते प्राबल्य त्यांचे लहान मोठे उद्योग विकत घेण्याचे वाढते प्रकार अशा ओक बाबीमुळे देशातील बेरोजगाराबाबतची समस्या प्रचंड गंभीर रूप धारण करीत आहे. हे खरे असून सुध्दा सरकार सतत परदेशी थेट गुंतवणूक निर्यातीमधून आथिक वाढ, सार्वजनीक उद्योगांची निर्गतवणुक, वित्तीय सुधारणासारख्या बार्बीना विशेष प्राधान्य देत असल्यामुळे बेकारी सारख्या समस्यांना विशेष महत्व दिले जात आहे. या सर्व बाबींचा परीणाम म्हणून देशातील गरीब जातेची कयशक्ती कमी होत चालली आहे म्हणून देशातील एकूण लोकसंखेपैकी ३० टक्के लोक दारीद्र रेषेखालील जीवन जगत आहेत.

सामाजीक आणि आर्थिक दृष्टिने मागास असलेल्या आसूचित जाती जमाती, महिला खेडयातील कष्टकरी लोकांना तिव्र स्वपात जागतीकीकरणाच्या झळा बसत आहेत. सर्वाजनीक क्षेत्रात दिवसेंदिवस मोठया प्रमाणात घट होऊ लागल्याने राखीव जागांच्या धोरणा बाबत समस्या निर्माण होऊ लागल्या आहेत. स्वातंत्र्योत्तर काळात भारत देशाने कामगारांच्या हिताचे अनेक महत्वाचे कायदे केलेले आहेत म्हणून औद्योगीक क्षेत्रात काम करणाऱ्या कामगारांचा विशेषकरून संघटतीत कामगारांचा फार मोठा फायदा झालेला आहे. तर दुसऱ्या बाजूचा विचार करता बहुसंख्य कामगार अशा कायद्याच्या संरक्षणापासून वंचीत राहिलेले आहेत. या कडे पण दुर्लक्ष करता येणार नाही. खरे तर कामगार कायद्यांच्या धोरणात कामगारांना अधिक शिस्त लावून व सामाजिक दृष्टया अधिक जबाबदार धरण्याची मोठी गरज होती पण तसे झाले नाही. तसेच दुसऱ्या बाजूला शिस्त, जबाबदारी आणि आर्थिक काटकसरीच्या नावांखाली कामगार विषयक कायद्ये आावश्यक ठरविंण्यात येऊ लागले आहेत. त्यामुळे कामगारांना कधिही काढून टाकण्याचे स्वातंत्र्य कारखाादारांना शक्य होत चाललेले आहे. कामगारांना अवास्तव संरक्षण दिल्याने त्यांच्या

भारतासारख्या विकसाशिल देशात तर जागतिकीकरणाचे गरीब जातेवरच विपरीत परिणाम होत असल्याचे दिसून येते. स्वातत्र्या नंतर आर्थिक प्रगतीचे फायदे हे बडया वर्गास झालेले दिसून येतात. व हा वर्ग २० टक्कांचा आहे. या उलट ८० टक्के ज-नता विकासाच्या फायद्या पासून वंचित आहे. शेतमजूर, अल्पभूधारक व लहाा शेतकरी जिराईत शेती करणारे मध्यम शेतकरी अनौपचारिक औद्योगीक क्षेत्रात कार्यरत कामगार कायद्यांचे संरक्षण ासलेले कामगार यांच्या बहूसंख्य स्त्रिया व आसूचित जाती जमातीचे लोक यांचा कमी अधिक प्रमाणात वंचित असलेल्या समूदायात समावेश होतो.

स्वातत्र्य मिळू ७० वर्षा पेक्षा अधिक काळ झाल्यांतर सूध्दा देशातील ग्रामिण भागात प्राथमिक शिक्षण, सार्वजनिक आरोग्य, रस्ते, वीज या प्राथमिक स्वरुपांच्या सुविधांचा अभाव दिसून येत आहे. थोडक्यात भारतासारख्या देशात कल्याणकारी राज्यांचा संकोच होणे सामाजिक दृष्टया हिताचे होणार नाही. ग्रामिण व शहरी भागातील गरीब जाता आर्थिक दृष्टया खालच्या स्तरातील आसूचित जाती जमाती मधील जनता गरीब महिला यांच्या आर्थिक हितासाठी सरकारचे अर्थव्यवस्थेत परिणाम कारक कल्याणकारी स्थान गरजेचे आहे.

**संदर्भ**

१. कोळंबे रंजा, भारतीय अर्थ व्यवस्था

२. शळके भास्कर, संशोधा स्वरूप आणि व्याप्ती.

३. लिमण एम.एस., पायाभूत अभ्यासक्रम १

४. कदम य.ना., विसाव्या शतकातील जगाचा इतिहास.

Aayushi International Interdisciplinary Research Journal
ISSN 2349-638X
www.aiirjournal.com